# महात्मा फुलेंच्या इतिहास लेखनाची समकालीन परिस्थितीमध्ये प्रस्तुतता

संशोधक
**अविनाश गंगाधर मलदोडे**

मार्गदर्शक
**डॉ. कोंडेकर आर. एस.**
इतिहास विभाग प्रमुख व संशोधन मार्गदर्शक राजीव गांधी महाविद्यालय, मुदखेड, जि. नांदेड

---

**प्रस्तावना :**

महात्मा फुलेंच्या ऐतिहासिक लिखानाचे समकालीन परिस्थितीमधील महत्त्व जाणून घेत असताना इतिहास लेखनाच्या ऐतिहासिक परंपरेचा थोडक्यात आढावा घेणे महत्त्वाचे आहे. इतिहासलेखनाच्या उदयाचा संबंध पुराणवस्तूशास्त्राशी जोडला जातो. सुरूवातीला अनुमानाच्या आधाराने संदिग्ध स्वरूपामध्ये इतिहासलेखन करण्यात आले. प्रामुख्याने नदीकाठी असलेल्या संस्कृतीच्या अभ्यासापासून मानवाला इतिहासलेखनाची प्रेरणा मिळालेली दिसून येते. प्रारंभी इतिहासलेखनास भूगर्भशास्त्राची फार मोलाची मदत मिळाली. पुढील काळामध्ये इतिहासालालेखनास सहाय्यभूत असणाऱ्या अनेक शास्त्रांची निर्मिती झाली. त्यामुळेच नंतरच्या काळात बुद्धिप्रामाण्यवादाच्या अस्तित्त्वातून इतिहासलेखनाच्या अनेक परंपरा उदयास आलेल्या दिसून येतात.

भारतीय इतिहासलेखन परंपरा फार उशिरा सुरु झाली. प्राचीन काळातील भारताचा इतिहास वेद, उपनिषदे, आरण्यके व पुराणे यातून शोधावा लागतो. परंतु यातील घटनांची पुराव्या अभावी पडताळणी करता येत नाही. याचे स्वरूप काव्यात्मक असून यामध्ये दंतकथाही असल्याचे दिसून आले आहे. त्यामुळे पुराणांना शास्त्रीय आधार नाही. तरीही यामधून तत्कालीन सामाजिक, राजकीय, अर्थिक व सांस्कृतिक स्थिती समजते. भारतामधील पर्शियन इतिहासलेखन परंपरेमध्ये सुल्तानशाही व मुघलकालीन इतिहासलेखन परंपरा असे दोन भाग पडतात. सुल्तानांनी इतिहासकारांना राजाश्रय दिला. परंतु घटनांची तर्कशुद्ध मांडणी करून , घटनांचा संबंध जोडून त्याची कारणमीमांसा इ. चा अभाव जाणवतो. बहुतेक इतिहासकार घटनांचे प्रत्यक्ष साक्षीदार होते. त्यामुळे माहिती बऱ्याच अंशी विश्वसनीय आहे. परंतु ऐकीव माहितीची शहानीशा केलेली दिसत नाही. त्यामुळे इतिहासलेखनाचे स्वरूप निवेदनात्मक झाले आहे. मुघलकालीन इतिहासलेखन परंपरेमध्ये घटनांची वस्तुनिष्ठता दिसते. या काळातील सम्राटांच्या प्रेरणेने लिहिलेला इतिहास स्तुतीपर व पक्षपाती होता. या काळातील इतिहासलेखनातून राजकीय विषयाबरोबर आर्थिक, सामाजिक व सांस्कृतिक बाबींवरही प्रकाश पडलेला दिसून येतो. यामधील कालगणना अचूक आहे या काळामध्ये आत्मचरित्र व प्रवासवर्णन अशा नवीन परंपरांची देखील इतिहालेखनामध्ये सुरूवात झाली.

**संशोधनाची उद्दिष्टे :**

१. अंधश्रद्धा निर्मूलना संबंधी महात्मा फुले यांच्या कार्याचा अभ्यास करणे.
२. स्त्री मुक्ती संदर्भात महात्मा फुले यांच्या कार्याचा अभ्यास करणे.
३. सामाजिक समतेसंबंधी महात्मा फुले यांच्या कार्याचा अभ्यास करणे.
४. सत्यशोधक समाजाविषयी महात्मा फुले यांच्या कार्याचा अभ्यास करणे.

**शेतकऱ्यांशी संबंधित भूमिका :**

भारतीय अर्थव्यवस्थेचा कणा म्हणून शेतीकडे पाहिले जाते. महात्मा फुले यांनी पारंपरिक शेती ऐवजी तांत्रिक ज्ञानावर आधारित शास्त्रशुदध पद्धतीने शेती करण्याचे प्रशिक्षण शेतकऱ्यांना देण्याची मागणी केली होती. [१]आज पारंपरिक शेती ऐवजी तंत्रज्ञानावर आधारित शेतीवर भर देताना अनेक शेतकरी आकर्षित झाले आहेत. सरकारी मदतीशिवाय आपल्या शेतात जल संवर्धनाचे काम करणाऱ्या शेतकऱ्यांना बक्षीस द्यावे त्यामुळे इतर शेतकऱ्यांना प्रेरणा व प्रोत्साहन मिळेल. तसेच उत्कृष्ट पशूसंवर्धन व पीक स्पर्धा आयोजित करून शेतकऱ्यामध्ये पशूसंवर्धन व विविध अन्नधान्याचे संवर्धन या विषयी जागृती निर्माण करण्याची भूमिका त्यांनी घेतली होती. महात्मा फुले यांनी घेतलेल्या भूमिकेतूनच कृषीप्रदर्शन, पशूप्रदर्शन व विक्री आणि जलसंवर्धन/ जलव्यवस्थापनासाठी जलयुक्तशिवार अशा प्रकारच्या विविध योजना या महात्मा फुले यांनी पूर्वीच ग्रंथित केल्या असल्याचे निदर्शनास येते. म्हणजेच महात्मा फुले हे द्रष्टे विचावंत होते. ज्याकाळात शेतीला प्रतिष्ठा नव्हती, निरक्षर अज्ञाणी शेतकरी शेतात राबत होता, त्याकाळी महात्मा फुले यांनी काळाच्या पुढे जाऊन शेतीला आधुनिक, फायदेशीर व शाश्वत बनविण्यासाठी आपले विचार मांडले होते.

**अंधश्रद्धा निर्मूलना संबंधी भूमिका व समकालीन परिस्थिती :**

मनुस्मृतीने भारतात मोठ्या प्रमाणात पोथीपुराण आणि रंजक कथा रचून सामान्य जनतेला कर्मकांडात गुंतविलेले होते. महात्मा फुले यांच्या काळात तर अंधश्रद्धा आणि कर्मकांडाने थैमान घातले होते. त्यामुळे महात्मा फुले यांनी अंधश्रद्धा निर्मूलनाच्या विषयावर विचार मांडून प्रत्यक्ष कार्य केले. सर्व सृष्टीचा निर्माता एकच "निर्मिक" असून सर्व स्त्री-पुरुष/ मनुष्यमात्र ही त्याचीच लेकरे आहेत. तो सर्वांचा पोशिंदा, न्यायकर्ता व उद्धारक आहे, अशी फुलेंची श्रद्धा होती. आराधना, भक्ती, पूजा, नैवेद्य, नवस, जप-तप, अनुष्ठान वगैरे या सर्वच गोष्टींचा त्यांनी निषेध केला. प्रार्थनेवर जरी त्यांचा विश्वास असला तरी मूर्तीपूजेला त्यांनी विरोध केला. कर्मकांडांना त्यांचा विरोध होताच परंतु जन्म, विवाह, ऋतूशांती, वास्तुशांती, प्रेतसंस्कार, श्राद्ध आदि विधी मधील तर्कदुष्टपणा आणि इच्छुकांचा त्यामागचा पोटार्थी हेतू त्यांनी वारंवार स्पष्ट केलेला आहे. बालकांच्या जन्मावेळी आकाशात असलेल्या ग्रह दिशेनुसार बालकांच्या नावाची मुळाक्षरे ठरविणे आणि त्या मूळाक्षरावरून जन्मपत्रिका मांडून त्याच्या भावी आयुष्यात संभवनाऱ्या लाभांची भविष्यवाणी वर्तविणे हा प्रकार फुलेंना शुद्ध ठगबाजीचा वाटतो. स्वतःला परमेश्वराचे अवतार म्हणून समाजात वावरणारे, चमत्कार सिद्धीचा दावा करणारे बुवा-बाबा, महाराज, स्वामी अशा नावाने ओळखले जाणारे बनावट लफंगे, अंधश्रद्धा निर्मूलन चळवळीला आव्हान देणारे ढोंगी गुरुबाज इत्यादींचा खरपूस समाचार महात्मा फुले यांनी घेतला आहे.

**स्त्री मुक्ती संबंधी भूमिका व समकालीन परिस्थिती :**

भारतीय समाजव्यवस्थेने पिढ्यानपिढ्या महिलांना विविध बंधनामध्ये बंदिस्त करण्याबरोबरच त्यांना मानवी हक्कांपासून वंचित ठेवलेले होते. या स्त्रियांना व्यक्तिमत्व विकासाची दारे खुली करण्याचे मौलिक कार्य करण्यामध्ये महात्मा फुले अग्रस्थानी होते. महात्मा फुले 'सार्वजनिक सत्यधर्म' या ग्रंथात स्त्री-पुरूष समानते संदर्भात म्हणतात की, "स्त्री पुरूष जन्मतः समान व स्वतंत्र मानावेत. निसर्गात स्त्री-पुरूषांचे सामाजिक स्थान व दर्जा हा जन्मतः समान आहेत", असे महात्मा फुले म्हणत. याशिवाय "स्त्रीमुक्तीचे आदयप्रवर्तक, विधवा विवाहास समाज मान्यता, केशवपनाला विरोध, बालहत्या प्रतिबंध आणि विधवांना आधार देण्याचे महत्त्वपूर्ण कार्य त्यांनी केले. स्त्रियांना समाजात सन्मानाची वागणूक मिळावी, या हेतुने त्यांनी प्रथमतः स्त्री उध्दाराच्या कार्याकडे आपले लक्ष

केंद्रीत केले. विधवांच्या परिस्थितीत सुधारणा घडवण्यासाठी त्यांनी विधवा विवाहास समाज मान्यता मिळवून दिली. तसेच विधवा स्त्रियांचे केशवपन करणाऱ्या दुष्ट प्रथेविरूध्द न्हाव्यांचा संप घडवून आणला. हिंदु धर्मशास्त्राने स्त्री-पुरूषांविषयी सांगितलेल्या विभिन्न मापदंडाविषयी महात्मा फुले म्हणतात की, "स्त्री आणि पुरूष समान असून सर्व मानवी अधिकारांचा उपभोग घेण्यास ते दोघेही पात्र असतात, स्त्रियांस जाचक नियम लागू करणे व लोभी पुरूषास दुसरा नियम लागू करणे, हा निव्वळ पक्षपात होय. एकंदरीत महात्मा फुले यांनी सामाजिक मानसिकतेवर पक्षपातीपणा केल्याचा अचूक ठपका ठेवत परिवर्तनाची भूमिका मांडली.

**सामाजिक समतेविषयी भूमिका व समकालीन परिस्थिती :**

महात्मा फुले यांच्या समकालीन समाजव्यवस्थेमध्ये उच्च-निचता आणि स्पृश्य-अस्पृश्य भावनेमुळे समाजात मोठ्या प्रमाणात विषमता निर्माण झाली होती. प्रस्थापित लोकांनी विषमता एवढी टोकाला नेली होती की, साधे पाणी पिण्याचा अधिकारसुद्धा हिरावून घेतला होता. ही परिस्थिती बदलण्यासाठी महात्मा फुले यांनी समविचारी मंडळींच्या सहकार्याने २४ सप्टेंबर १८७३ रोजी पुण्यात सत्यशोधक समाजाची स्थापना केली. सत्यशोधक समाजाच्या माध्यमातुन महात्मा फुले यांनी प्रचलित समाजव्यवस्थेतील विषमतेवर प्रहार करून सामाजिक समता प्रथापित करण्यासाठी जनजागृती केली. त्यांचा 'गुलामगिरी' हा ग्रंथ म्हणजे विषमतेविरोधी आंदोलनाची नांदीच होती. "गुलामगिरी" या ग्रंथातून महात्मा फुले यांनी प्रचलित समाजव्यवस्थेतील विषमतेवर सडेतोडपणे टिका केली. सामाजिक विषमतेला विरोध करताना महात्मा फुले म्हणतात की, "निर्सगातील विषमता ही गुणवैशिष्टयांवर अवलंबून आहे. जातीव्यवस्था हि जन्मावर आधारीत असल्यामुळे तिचे समर्थन करता येत नाही. राजकीय सुधारणा आधी की समाजिक सुधारणा आधी याबाबत महात्मा फुले म्हणतात की, राजकीय सुधारणांआधी समाजिक सुधारणा झाल्या पाहिजेत. लोकशाहीच्या निवडणुका या लोकांच्या प्रश्नावर किंवा भारताच्या ध्येय धोरणावर होत नसून त्या जात- धर्म आणि कर्मकांड यांच्याभेवतीच फिरत आहेत. त्यामुळेच स्वातंत्र्य मिळून आज ७५ वर्षे संपले तरी देशातील लोकांचे अज्ञान संपले नाही. यावरून राजकीय स्वातंत्र्याऐवजी सामाजिक सुधारणा भारतात अगोदर होणे गरजचे होते. त्यामुळे आजसुद्धा महात्मा फुले यांचे विचार भारतासाठी किती महत्त्वाचे आणि दिशादर्शक आहेत ते कळून येते.

**शिक्षणासंबंधी विचार आणि समकालीन परिस्थिती :**

महात्मा फुले अपल्या निवेदनात म्हणतात की, "उच्यवर्णीयांच्या शिक्षणावर खर्च करण्यामागे सरकारची जी अपेक्षा आहे की, हे लोक खालच्या स्तरांतील लोकांपर्यंत शिक्षणाचा लाभ पोचवतील हा समाज अनाठायी आहे. सरकारने स्वतःच दलित शोषितांच्या शिक्षणाची जबाबदारी स्विकारली पाहिजे. तसेच शाळा कॉलेजातून जेवढे देशी लोक शिकुन बाहेर पडतील त्या सर्वांनाच नोकऱ्या मिळणे कठीण असते. ग्रामीण क्षेत्रात शिक्षणाचा प्रसार व्हावा, व्यवहारोपयोगी अभ्यासक्रम आखले जावेत आणि शिक्षण पूर्ण झाल्यावर शुद्रातिशुद्रांना अग्रक्रमाने नोकऱ्या द्याव्यात. स्वातंत्र्यानंतरच्या ७५ वर्षातसुद्धा पारंपरिक शिक्षण पद्धतीवरच भर देण्यात आला आहे, त्यामुळे आज देशाच उच्च शिक्षण घेतलेले कोट्यावधी तरूण बेकार आहेत. डॉक्टरेट सारखे सर्वोच्च शिक्षण घेऊन सुद्धा विद्यार्थी स्वत:चेच पोट भरू शकत नाहीत अशी बिकट परिस्थिती निर्माण झाली आहे. त्यामुळे आज महात्मा फुलेनी म्हटल्याप्रमाणे शाळा कॉलेजातून शिक्षण घेऊनबाहेर पडलेल्या विद्यार्थ्यांना नोकऱ्या मिळणे कठीण झाले आहे. त्यासाठी परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेऊन महात्मा फुलेनी पारंपरिक शिक्षणाबरोबर तांत्रिक व व्यवहारउपयोगी शिक्षणाला जास्तीचे प्राधान्य देण्याची भूमिका घेतली होती. आज जगात सर्वात जास्त तरूण

भारतात असूनसुद्धा त्यांच्या हाताला काम नाही. महात्मा फुले यांनी म्हटल्याप्रमाणे पारंपरिक पद्धतीबरोबर वेळीच तांत्रिक, व्यावसायिक आणि कृषी पुरक शिक्षण दिले गेले असते तर आज देशात बेरोजगारी निर्माण झाली नसती. केवळ नोकरीसाठी शिक्षण ही संकल्पाना महात्मा फुले यांना मान्य नव्हती. म्हणून तांत्रिक व व्यवहारोपयोगी शिक्षणावर भर देऊन नागरिकांना केवळ नोकरीपेक्षा स्वंयरोजगार उपलब्ध करून देऊन स्वंयपूर्ण बनविण्याचा आग्रह ते धरतात. एकंदरीत महात्मा फुले यांचे विचार आजही देशाला मार्गदर्शक ठरणारे आहेत.

**सत्यशोधक विचार व समकालीन परिस्थिती :**

कैंट नावाचा समाज शास्त्रज्ञ म्हणतो, अज्ञान आणि स्वार्थ भावना ज्या समाजात असतात असा समाज प्रगतीपासून कितीतरी दूर फेकला जातो.[२७] भारतीय समाजात अज्ञान व स्वार्थ भावना खचून भरलेली आहे. त्यामुळे अज्ञान, स्वार्थ, निरक्षरता हे मानवाच्या प्रगतीचे दारे बंद करून मानवजातीला पिंजऱ्यात बंदीस्त करतात . विवेकशक्ती गमावून बसलेल्या समाजाला किंवा शुद्रतिशुद्र समाजाचा विकास शिक्षणाशिवय होऊ शकत नाही, तसेच इंग्रजी ज्ञानाशिवाय मनुस्मृतीच्या जंजाळाचे खंडण होणार नाही, असे महात्मा फुलेंना वाटत होते. त्यांनी पुढे सामाजिक कार्यात भाग घेऊन विधवा पुनर्विवाह, बालहत्या प्रतिबंधक गृह आणि २४ सप्टेंबर १८७३ रोजी सत्यशोधक समाजाची स्थापना करून सामाजिक परिवर्तनाला सुरूवात केली. सत्यशोधक चळवळीचा प्रचार करण्यासाठी जाहीर सभा, पत्रके व पुस्तिका या माध्यमांवर भर देण्यात आला.

सत्यशोधक समाजाचा विचार सत्य, तर्क व बुद्धीप्रामाण्यवादावर आधारित असल्याने या ठिकाणी हिंदू समाजातील अंधश्रद्धा आणि कर्मकांड यांना मुळीच थारा नव्हता. "सत्यशोधक समाज म्हणजे प्रस्थापित समाजाने दीन-दुबळया, वाळीत टाकलेल्या लोकांच्या भावनांचा उद्रेक होता. सत्यशोधक समाज म्हणजे समतेवर विश्वास घोषीत करणारी महाराष्ट्रातील पहिली चळवळ होती. सत्यशोधक समाजाचा लढा भटशाही, सामाजिक व धार्मिक गुलामगिरीच्या विरोधात होता. सत्यशोधक समाजाची स्थापना वर्णव्यवस्थेचे उच्चाटन करून शुद्रातिशुद्र समाजाला जातीऐवजी गुणावर आधारित श्रेष्ठता बहाल करणे व स्त्री-पुरुष समानता प्रस्थापित करून वर्णव्यवस्थेच्या जोखडातून शुद्रातिशुद्र घटकांना मुक्त करणे हा सत्यशोधक समाजाचा मुख्य उद्देश होता.

एकंदरीत महात्मा फुलेंनी सत्यशोधक समाजाच्या स्थापनेतून हक्क व अधिकारांचे सार्वजनिकीकरण करुन सर्वांना समानतेच्या वाटेवर एका रेषेत उभे करण्याचा प्रयत्न केला. एवढेच नव्हे तर गुणवत्ता व प्रतिष्ठा सर्वांसाठीच समान असून ती प्राप्त करण्याचा अधिकार सर्वांनाच आहे. आणि ती प्राप्त करता आली पाहीजे, असे महात्मा फुलेंनी सांगीतले. धार्मीक गुलामगीरीचा पगडा, दैववादात बुढालेली सामान्य जनता, धर्माच्या नावावर अवडंबर माजवून जनसामान्यांची लूट करणारे पाताळयंत्री विरोधक अशा विचित्र व धोकादायक आणि प्रतिकूल परिस्थितीतही महात्मा फुलेंनी सत्यशोधक समाजाच्या माध्यमातून सामाजिक पुनर्रचनेचे कार्य केले, ही तत्कालीन परिस्थितीत एक सामाजिक क्रांतीच होती.

**सारांश :**

इ.स. पूर्व ६ व्या शतकात गौतम बुद्धांनी बौद्ध धम्माची स्थापना करून भारतीय जनमाणसात विवेकाधीष्टीत तर्क विचाराच्या बिजारोपणाची पायाभरणी केल्याचे स्पष्ट होते. या विचारधारेतूनच नवसमाज निर्मितीची दारे खुली होण्यास सुरूवात झाली. ही विचारधारा राष्ट्र व समाज विकासासाठी आवश्यक ठरल्यामुळे सम्राट अशोकानेही इ.स. पूर्व तिसऱ्या शतकात याच विचारधारेचा स्विकार करुन समाजाच्या उद्धारासाठी स्वतःचे आयुष्य अर्पण केल्याचे दिसून येते. अज्ञानामध्ये होरपळणाऱ्या समाजाला जोपर्यन्त ज्ञानदृष्टी मिळत नाही, तोपर्यंत आपल्या

विचारांच्या कक्षा रूंदावता येत नाहीत. किंबहुना प्रगतीचे शिखर ही पादांक्रात करता येत नाही. सम्राट अशोकाच्या नंतर हा विचार प्रवाह खंडीत होतो की काय अशी शंका भारतीय समाजात निर्माण झाली होती. परंतु पुढे चार्वाक, महात्मा बसवेश्वर, संत तुकाराम, संत कबीर व महात्मा फुले यांनी हा विचार प्रवाह खंडीत होवू न देता तो निरंतर प्रज्वलीत ठेवला. मनुस्मृती मध्ये विषमतेच्या संहीतेव्दारे माणसाला पशुतुल्य बनवून अस्पृश्य शुद्रातिशुद्र समाजाचे माणूसपण हिरावून घेण्यात आले होते. या विषारी वर्णव्यवस्थेला तडे देण्याचा पहिला प्रयत्न महाराष्ट्रात महात्मा फुलें यांनी केला. त्यामुळेच आज महाराष्ट्रात शैक्षणिक व सामाजिक सुधारणा, परिवर्तन घडवून झाले आहे, यामध्ये महात्मा फुले यांचे योगदान फार मोठे आहे.

**संदर्भग्रंथ :**


- फडके य. दि.-संपादक, १९९९, महात्मा फुले संग्रह वाङ्मय, महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ, मुंबई, पंचमावृत्ती
- मुलाटेवासुदेव (संपा.),२०००, 'शेतकऱ्याचा असुड', स्वरूप प्रकाशन, चतुर्थावृत्ती
- नरके हरी, १९९३, आम्ही पाहिलेले महात्मा फुले चरित्र साधने, प्रकाशन समिती, महाराष्ट्र शासन, मुंबई
- भोळे भा. ल, २००१, माहात्मा जोतीराव फुले वारसा आणि वसा, साकेत प्रकाशन, द्वितीयावृत्ती,
- नांदेडकर व. गो., २०११, राजकीय विचार आणि विचारवंत, डायमंड पब्लिकेशन, पुणे, प्रथमावृत्ती, पृ.क्र.२७५
- शिंदे ज. रा., १९८५, डायनामिक्स ऑफ कल्चरल रेव्होल्युशन, नाईन्टीन्थ सेंच्युरी महाराष्ट्र, अंजठा पब्लिकेशन, जळगाव, प्रथमावृत्ती,
- नरके हरी, २००६, महात्मा फुले साहित्य आणि चळवळ, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महात्मा फुले आणि राजर्षी शाहू चरित्र्य साधने प्रकाशन समिती, महाराष्ट्र शासन, मुंबई, प्रथमावृत्ती,
- मालशे स. ग., १९६९-संपादक, महात्मा फुले समग्र वाङ्मय, महाराष्ट्र शासन मुंबई, पृ.क्र.३७२
- साळुंके पी. बी.-संपादक, १९८२, महात्मा फुले गौरव ग्रंथ, महाराष्ट्र राज्य शिक्षण विभाग, मुंबई,


Research Hub International Journal